# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/12/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन कुही अंतर्गत विशेष पथकाची कामगिरी

दिनांक २७/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ अवैध्य धंदयावर कार्यवाही करणेकामी पो.स्टे. कुही परीसरात पेट्रोलींग करीता फिरत असतांना विश्वसनीय मुखबीरद्वारे खबर मिळाली की, मौजा उटी ते व्हि. आय. टी. कॉलेज मार्गाने विनापरवाना रेतीने भरलेला १० चक्का टिप्पर येत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून पोलीस स्टाफ सह मिळालेल्या खबरेच्या ठिकाणी मौजा उटी ते व्हि. आय. टी. कॉंलेज येथे नाकाबंदी केली असता दि. २७/१२/२०२३ चे ००/१५ वा. दरम्यान उमरेड कडुन १ टिप्पर येतांनी दिसले. त्यास उटी गावाजवळ नाकाबंदी दरम्यान थांबवुन ट्रकची पाहणी केली असता त्या १० चक्का टिप्परमध्ये रेतीने भरलेले दिसुन आल्याने १) टिप्पर क्र. एम. एच.—४९/ए.टी— ३९५९ चा चालक आरोपी नामे— शुभम क्रिष्णाजी आरेकर, वय २५ वर्ष, रा. सोनेगाव राजा ता. कामठी, जि. नागपुर याला रेतीच्या परवानाबाबत विचारले असता रेतीचा परवाना नसल्याचे सांगीतले. सदर १० चक्का टिप्पर क्र. एम. एच.—४९/ए.टी—३९५९ किंमती ३०,००,०००/—रू. त्यामध्ये ०५ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. चा मुद्देमाल सह असा एकुण ३०,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन टिप्पर मालक नामे —देविदास भाउराव ढगे, रा. हुडकेश्वर रोड, माडगी नगर नागपुर यांचा सांगण्यावरून आरोपी ट्रक चालक हा पवनी घाटावरून अवैध्यरित्या विनापरवाना आपले १० चक्का टिप्पर मध्ये भरून वाहतुक करित असतांना मिळुन आल्याने आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९ भादवी. सहकलम ४८ (८) महाराष्ट्र महसुल अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा. हरीदास देविदास चाचरकर, ब.नं. २०७१ पो.स्टे. कुही यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस अधिक्षक विशेष पथक नागपुर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचरकर, पोशि गोरख निंबार्ते, बांते यांनी पार पाडली.

# चोरी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत २३ कि. मी. अंतरावरील मौजा खरसोली शिवार येथे दिनांक २०/१२/२०२३ चे १७.०० वा. ते १९/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– बलवीर तुळशीराम पाटील, वय ४३ वर्ष रा. प्लाट नंबर २४२ उंटखाना ता. जि. नागपुर याची मौजा खरसोली येथील खसरा क्र. १३९/२ च्या ले आउट मधील ०५ लोखंडी विदयुत पोल प्रत्येकी किंमती २२,०००/–रू. असा एकुण १,१०,०००/–रू. चा मुद्देमाल चार चाकी गाडी क्र. एम. एच.– ४९/ ए. टि– २१०० चा चालक व दोन अनोळखी इसमांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक लभाने यांनी भेट दिली असुन पुढील गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार अरविंद चव्हाण मो. नं. ७४९९६०४६७२ हे आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**